ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ | पुणें, बुधवार तारीख ४ जुलै, १९६२ | अंक १३

## विविध माहिती

**पाकिस्तानच्या रेल्वेजचा विकास**—पाकिस्ताननें आपल्या रेल्वेरस्त्यांच्या विकासाची योजना आंखली असून त्यासाठी अमेरिकेकडून कर्ज मिळविलें आहे. पूर्व व पाश्चिम पाकिस्तानांतील रेल्वेवाहतुकीची सुधारणा व विकास करण्यासाठी अमेरिकेनें पाकिस्तानला आणखी ३·९१ कोटी रुपयांचें कर्ज दिलें आहे. ही रक्कम धरून पाकिस्तानच्या रेल्वेविकासासाठी अमेरिकेनें आतांपर्यंत ८·३ कोटी डॉलर्स दिलेले आहेत.

**जनता मोटारगाडीसंबंधीं निर्णय**—लोकांना परवडण्यासारखी एक जनता मोटारगाडी भारतांत तयार करण्यासंबंधीचा निर्णय मध्यवर्ती सरकार लवकरच घेणार आहे. गाड्या तयार करण्याचा कारखाना काढण्यासाठी अनेक राज्यांनीं सोयीसवलती देऊं केल्या आहेत. परंतु कारखान्याची जागा अद्याप निश्चित करण्यांत आलेली नाहीं. गाडीची किंमत ५,००० रुपयांच्या जवळपास ठेवण्यांत येणार आहे.

**पटदीप बंदरासाठी जपानी तज्ज्ञ** — ओरिसांतील पटदीप बंदर भारतामधील खोल समुद्रांतील पहिलें बंदर ठरणार आहे. बंदराची उभारणी करण्यासाठी जपानी तज्ज्ञांची एक तुकडी भारतांत येणार आहे. ओरिसामधील कच्चें लोखंड जपानला निर्यात करण्यासाठी बंदराचा उपयोग प्रामुख्यानें करण्यांत येणार आहे. लोखंडाच्या खाणी व बंदर ह्यांना जोडणारा १०० मैल लांबीचा रस्ताहि तयार करण्यांत येणार आहे.

**बंगलोरमधील तबेले हलविणार**—बंगलोर कॉर्पोरेशननें गांवांतील गुरांचे गोठे शहराबाहेर हलविण्याचें ठरविलें आहे. बंगलोर शहरांतील दाट लोकवस्तीच्या भागांत सुमारें २५,००० गुरें अनेक गोठ्यांतून विखुरलेलीं आहेत. प्रथम २,००० गुरांना शहराबाहेरील जागेंत हलविण्यांत येणार आहे. शहरापासून ४ मैलांवर ५० एकरांची जमीन वसाहतीसाठी निवडण्यांत आली आहे.

**बँकचोराची पंचाईत** — लंडनमधील एका बँकेंत चोरी करण्याचे उद्देशानें एका इसमानें बँकेच्या इमारतींत रस्त्यावरील खिडकींतून उडी मारली. परंतु ह्या प्रयत्नांत त्याचा पाय दुखवला व त्याला स्वतःची सुटकाहि करून घेतां येईना. अखेर चोरानें स्वतःच पोलिसांना टेलिफोन करून आपली सुटका करून घेतली.

**भारत व पाकिस्तान ह्यांनीं एक व्हावें**—समाजवादी पुढारी डॉ. राममनोहर लोहिया हैद्राबाद येथें बोलतांना म्हणाले कीं, भारत व पाकिस्तान ह्या दोन देशांनीं कोणत्या तरी प्रकारच्या संघराज्यांत एकत्र यावें. भारताची फाळणी झाल्यामुळें उभयता देशांपुढें जे प्रश्न उभे राहिले आहेत ते अजून सुटलेले नाहींत. म्हणून त्यांनीं पुन्हा एकत्र येण्याची आवश्यकता आहे.

**अणुयुद्ध झालें तर** —राडारचा शोध लावणारे शास्त्रज्ञ सर वॅटसून वॅट ह्यांनीं अमेरिका करणार असलेल्या प्रायोगिक अणुबाँब स्फोटाला विरोध दर्शविला आहे. एका अमेरिकन जीवशास्त्रज्ञानें असा इषारा दिला आहे कीं, जगांत अणुयुद्ध झालें तर नंतर राहिलेल्या उध्वस्त जगांत कीटकांची अपरंपार निर्मिति होईल. कारण, कीटक हे मनुष्यप्राण्यापेक्षा किरणोत्सर्गाच्या धोक्याला अधिक चांगल्या रीतीनें तोंड देतात.

**आस्वान येथील धरणाचें काम**—इजिप्तमधील नाइल नदीवर आस्वान येथें रशिआच्या मदतीनें मोठें धरण बांधण्यांत येत आहे. ह्या धरणाचा पहिला टप्पा १९६४ अखेर पुरा होईल असा अंदाज आहे. धरण पूर्ण होण्यास १९७० साल उजाडेल. धरणावर पाण्याच्या साह्यानें २१,००,००० किलोवॅट वीज निर्माण करण्यांत येईल. सुमारें २० लाख एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होईल.

**पिंपरी कारखान्यांतील कामगारांचा महागाई भत्ता**—पिंपरी येथील हिंदुस्थान अँटीबॉयोटिक्स कारखान्याच्या चालकांनीं कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांचा महागाईभत्ता वाढविण्याचें ठरविलें आहे. ज्यांचा मासिक पगार ३२० रुपयांपर्यंत आहे त्यांना ५ ते १० रुपये अधिक महागाईभत्ता देण्यांत येणार आहे. १९६१ च्या नोव्हेंबर महिन्यापासून हा निर्णय अमलांत आणावयाचा आहे.

**बिहारमध्यें नवे उद्योगधंदे**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत बिहारमध्यें खाजगी मालकीच्या विभागांत बरेच नवीन उद्योगधंदे निघण्याचा संभव आहे. मिश्र पोलादाच्या हत्यारांचे दोन कारखाने, १५ सुताच्या गिरण्या, एक कापडाची गिरणी, साखर, सिमेंट व कागद कारखान्यांना लागणाऱ्या यंत्रसामग्रीचा एक कारखाना, इत्यादींचा समावेश त्यांत आहे.

**मराठी नाटकाचें हिंदी रूपांतर**—सुप्रसिद्ध नाटककार श्री. पु. ल. देशपांडे ह्यांच्या 'तुझे आहे तुजपाशीं' ह्या मराठी नाटकाच्या हिंदी रूपांतराचा प्रयोग मुंबईला जयहिंद कॉलेजमध्यें सादर करण्यांत आला. नाटकाचें हिंदी नांव ' कस्तुरी मृग ' असें ठेवण्यांत आलें आहे. मूळ नाटकांतील विनोद हिंदी रूपांतरांतहि चांगला साधला आहे.


**हुगळीवरील नवा पूल** — कलकत्ता शहरांतील वहातूक वाढल्यामुळें हुगळी नदीवर नवा पूल बांधण्याचा विचार चालू आहे. पुराच्या तांत्रिक पहाणीसाठी जागतिक बँकेनें आर्थिक साह्य देण्याचें कबूल केलें आहे.

**टायर्सच्या कारखान्याचें उत्पादन**—प्रीमियर टायर्स ह्या कंपनीनें अमेरिकन कारखान्याच्या मदतीनें अर्णाकुलम येथें मोटारीचे टायर्स तयार करण्याचा कारखाना उभारला आहे. कारखान्यानें उत्पादनास नुकतीच सुरवात केली आहे. ह्या कारखान्यांत दररोज १,००० टायर्स तयार करतां येतील. केरळ भारतामधील रबर उत्पादनापैकी ३० टक्के रबर निर्माण करतो. परंतु आतांपर्यंत तेथें टायर्सचा एकहि कारखाना नव्हता.

**आधुनिक जगाचें प्रतिक**—पंतप्रधान पं. नेहरू ह्यांनीं राज्य-सभेंतील परराष्ट्रीय धोरणावरील चर्चेंत भाग घेतांना अणुयुद्धाच्या संभवाचा उल्लेख केला. ते म्हणाले कीं, अणुबाँबचा स्फोट करण्यांत आला म्हणजे एक विशिष्ट आकाराचा ढग आकाशांत निर्माण होतो. हा ढग म्हणजे सध्यांच्या जगाचें प्रतीक मानावयास हरकत नाहीं. आज सर्व जग ह्या ढगाच्या छायेखालीं वावरत आहे. संभाव्य अणुयुद्धाची आठवण त्यामुळें सारखी ताजी राहात आहे.

**निर्वासितांची सोय**—पूर्व पाकिस्तानांत झालेल्या दंगलीमुळें राजशाही जिल्ह्यांत शेंकडों लोक निर्वासित झाले असून ते भारतांत येत आहेत. पश्चिम बंगालमधील मालडा जिल्ह्यांत ते बऱ्याच संख्येनें जमले आहेत. बहुतेक निर्वासित संथाळ जमातीचे आहेत. अशा १,००० शेतकरी निर्वासितांची दंडकारण्य वसाहतींत सोय करण्यांत येत आहे. पाकिस्तानांत अजूनहि २०,००० संथाळ असावेत.

**चहाच्या धंद्याला मदत**—आसाम टी प्लँटर्स असोसिएशन या संस्थेचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यांत आला. ह्या संघटनेंत हिंदी नागरिकांच्या मालकीच्या चहाच्या मळ्यांचाच समावेश झालेला आहे. ह्या प्रसंगीं भाषण करतांना मध्यवर्ती अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई म्हणाले कीं, चहाच्या उत्पादनाची वाढ करून त्याच्या निर्यातींतहि वाढ करणें अगत्याचें आहे. अर्थातच ह्या धंद्याला मदत करण्याची सरकारची सदैव तयारी आहे.

शेतीचे उत्पादन
वाढवून स्वतःचा
व
देशाचा उत्कर्ष
साधा

यासाठीं
किर्लोस्कर
स्थापना १८८८
• इलेक्ट्रिक पंपिंग सेटस्
आणि
• उंसाचे चरक वापरा

शेती व उद्योगधंद्यात आज किर्लोस्कर पंपिंग सेटस् व इतर यंत्रसामग्री मोठ्या संख्येने काम करीत असून ती औद्योगिक व शेतीच्या प्रगतीस मोठा हातभार लावीत आहे. कोणतीही किर्लोस्कर यंत्रसामग्री असो ती खात्रीलायक असल्याने ग्राहक किर्लोस्कर मालाचीच प्रथम निवड करतात.

सविस्तर माहितीसाठीं लिहा
किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड
किर्लोस्करवाडी जि. सांगली.

# अर्थ

बुधवार, ता. ४ जुलै, १९६२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परदेशीय चलन मिळविण्यासाठी प्रयत्न

### काजू आणि मसाल्याचे पदार्थ

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणारें परदेशीय चलन पुरेशा प्रमाणांत उपलब्ध नसल्यानें भारताच्या आर्थिक विकासांत अडथळे उत्पन्न होण्याची शक्यता आतां सर्वश्रुत झाली आहे. निर्यात व्यापार वाढवून परदेशीय चलन मिळविण्याचे प्रयत्न अर्थातच चालू आहेत. त्रिवेंद्रम् येथें बोलतांना मध्यवर्ती सरकारचे शेतकी-मंत्री डॉ. राम सुभानसिंग ह्यांनीं ह्या विषयाचा उल्लेख केला आहे. ते म्हणाले कीं, मसाल्याचे पदार्थ आणि काजू ह्यांचें उत्पादन वाढवून ह्या पदार्थांची निर्यात वाढविण्याचा सरकारचा विचार आहे. ह्या मालासाठी नव्या बाजारपेठा हुडकण्याचा प्रयत्न सरकार करणार आहे. सध्यां ह्या पदार्थांच्या निर्यातीमुळें भारताला दरसाल ३० कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ति होत असते. इंडिअन सेंट्रल स्पाइसेस अँड कॅश्युनट्स कमिटीच्या पहिल्या बैठकीच्या वेळीं ते उद्घाटनाचें भाषण करीत होते. ते पुढें म्हणाले कीं, मसाल्याचे पदार्थ व काजू ह्यांच्या उत्पादनांत भारत इतर देशांच्यापेक्षा आघाडीवर आहे. तथापि ह्याचा अर्थ उत्पादनांत वाढ करण्यास अद्याप वाव नाहीं, असा नाहीं. ह्या पिकांचा विकास करण्यासाठी उत्तेजन देण्याचें सरकारचें धोरण आहे. इतर कांहीं प्रकारच्या मालाच्या निर्यातीची वाढ करण्यासाठी ज्याप्रमाणें कमिट्या स्थापन करण्यांत आल्या आहेत, त्याचप्रमाणें हीहि कमिटी आहे. ह्या मालाचें उत्पादन वाढविणें, त्याला बाजारपेठा मिळवून देणें, त्यासंबंधीं संशोधन करणें, इत्यादि कामें करण्यासाठी कमिटीची स्थापना करण्यांत आली आहे.

काजूच्या पिकाचा विकास करण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १·९० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. ह्या कार्यक्रमांत मुख्यतः नव्या लागवडीचा समावेश करण्यांत आला आहे. ८ लाख एकर जमिनींत काजूची लागवड नव्यानें करण्याचा सरकारचा विचार आहे. ही लागवड मुख्यतः महाराष्ट्र, ओरिसा व म्हैसूर राज्यांत होईल. महाराष्ट्र राज्यांत ५ लाख एकर, ओरिसांत १ लाख एकर आणि म्हैसूर राज्यांत ७५,००० एकर जमीन काजूच्या लागवडीखालीं आणण्याचे उद्दिष्ट ह्या राज्यांपुढें ठेवण्यांत आलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत केरळ, म्हैसूर व आसाम राज्यांत मिऱ्यांची लागवड वाढविण्याच्या योजना हातीं घेण्यांत आल्या होत्या. ह्या योजनांचा आणखी विस्तार करण्यांत येणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मिऱ्यांची लागवड पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्र ह्या राज्यांतूनहि करण्यांत यावयाची आहे. ह्या कार्यक्रमांत एकूण सुमारें १६,७६० एकर जमिनींत मिऱ्याची लागवड नव्यानें करण्यांत येणार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत म्हैसूर व केरळ राज्यांत लवंगांच्या लागवडीचा विकास करण्याचें काम हातीं घेण्यांत आलें होतें. आतां लवंगांची लागवड पश्चिम बंगालमध्येंहि करण्यांत येणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सुंठेच्या पिकाची वाढ करण्यासाठी प्रथमच प्रयत्न करण्यांत आले. केरळ, आसाम आणि हिमाचल प्रदेशांत हे प्रयत्न करण्यांत आले. त्यावर १२·९ लाख रुपये खर्च करण्याची तरतूद केली होती. त्याशिवाय मसाल्यांत वापरण्यांत येणाऱ्या इतर पदार्थांच्या लागवडीचा विकास करण्यासाठीहि केंद्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत.

---

## १९६१ मधील बँकिंग

(१) १९६१ मध्यें बँकांकडील ठेवींत मोठी भर पडल्यामुळें त्यांचेवरील ताण कमी झाला; त्यांच्या पैशांचा तरतेपणा सुधारला.

(२) शेड्यूल्ड बँकांच्या ठेवी (पी. एल. ४८० ठेवी वगळून) १८० कोटी रुपयांनीं वाढल्या; त्यांची रक्कम १७५७ कोटी रु. झाली. १९६० मध्यें १०२ कोटी रु. ची वाढ झाली होती. ठेवींत एवढी प्रचंड वाढ ह्यापूर्वी कोणत्याहि वर्षी झाली नव्हती.

(३) टाइम ठेवी १४४ कोटी रु. नीं वाढल्या, तर डिमांड ठेवींत ३६ कोटी रु. ची भर पडली.

(४) रिझर्व्ह बँकेकडून शेड्यूल्ड बँकांनीं घेतलेल्या कर्जांत ४३ कोटी रु. ची घट झाली. १९६० मध्यें ह्या कर्जांत ५० कोटी रु. ची वाढ झाली होती.

(५) ठेवींच्या वाढीचे मानानें दिलेल्या कर्जांत कमी वाढ झाली. त्यामुळें सरकारी रोख्यांतील गुंतवणूक ३९ कोटी रु. नीं वाढून ती ४३९ कोटी रु. वर गेली. १९६० सालीं शेड्यूल्ड बँकांनीं आपल्या गुंतवणुकीपैकीं ९० कोटी रु. चे रोखे विकून रोकड घेतली होती.

(६) इनव्हेस्टमेंटचें ठेवींशीं प्रमाण २९·४% चें २९·२% झालें. इनव्हेस्टमेंट वाढली, तशा ठेवीहि वाढल्यामुळें प्रमाण तसेंच राहिलें.

(७) १९६० चे मानानें १९६१ मध्यें दिलेल्या कर्जांत निम्म्यानें (११४ कोटी रु.) वाढ झाली. १९६० मधील वाढ २०८ कोटी रु. ची होती. कर्जाचें ठेवींशीं प्रमाण ७०·८% पडलें; १९६० मध्यें तें ७१·६% होतें.

(८) ५ कोटी रु. पेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या २७ मोठ्या शेड्यूल्ड बँकांच्या नफा-तोटा पत्रकांची छाननी करतां, त्यांचे नफे (कराची तरतूद करून) २·८ कोटी रु. नीं (३४%) वाढले; त्यांची रक्कम ११ कोटी रु. झाली. १९६० मधील नफ्याची वाढ १·१ कोटी रु. (१५%) होती.

(९) शाखावाढीची गति मंदावली. व्यापारी बँकांच्या शाखांत ८४ ची भर पडून त्यांची संख्या ५,१११ झाली. १९६० मध्यें १८० शाखांची भर पडली होती.

(१०) हिंदी बँकांच्या परदेशांतील कचेऱ्यांची संख्या १०१ आहे. त्यांचा धंदा कमी कमी होत चालला आहे.

---

## रशिआ भारतामधील केळीं घेण्यास तयार

भारतामधील निरनिराळ्या मालाची निर्यात वाढविण्यासाठी निर्यात-वाढ मंडळें स्थापन करण्यांत आलीं आहेत. ज्या मालाच्या निर्यातीनें भारताला परदेशीय चलनाची प्राप्ति मोठ्या प्रमाणावर होते, अशा मालाच्या निर्यातीला अर्थातच प्राधान्य दिलें जातें. तथापि प्रगत देशांना हवा असणारा कोणताहि माल निर्यात केल्यानें भारताच्या औद्योगीकरणाला थोडीबहुत मदत होतेच होते. या दृष्टीनें रशिआकडून भारताच्या केळ्यांना आलेली मागणी उपयुक्तच म्हटली पाहिजे. येत्या तीन वर्षांत भारताकडून दरसाल २ कोटी रुपयांची केळीं घेण्याची तयारी रशिआनें दाखविली आहे. ह्या कालानंतर ह्याहिपेक्षा अधिक केळीं घेण्याचा विचार रशिआ करणार आहे. रशिआकडून आलेल्या मागणीचा फायदा करून घेणें कितपत शक्य आहे तें पहाण्यासाठीं भारत सरकारनें पश्चिम व दक्षिण भारतामधील केळ्यांच्या उत्पादकांशीं व व्यापाऱ्यांशीं वाटाघाटी चालविल्या आहेत. केळ्यांची निर्यात मोठ्या प्रमाणावर करावयाची झाली तर कांहीं अडचणींचे प्रश्न सोडवावे लागतील. केळीं जमविणें, त्यांची वहातूक करून तीं निर्यातीच्या बंदरापर्यंत पोंचविणें, हीं कामें थोडीशीं त्रासाचीं आहेत. कारण केळीं हा पदार्थ नाजूक असून लवकर खराब होणारा आहे. त्यांची निर्यात करण्यासाठीं बोटींत शीतगृहाची व्यवस्था करावी लागेल. केळ्यांच्या निर्यातीविषयीं विचार करण्यासाठी महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटीची बैठक भरली होती. या संस्थेनें गेल्या हंगामांत १२ लाख रुपये किंमतीचीं केळीं इराणच्या आखातामधील बंदरांकडे निर्यात केलीं होतीं. महाराष्ट्रांत केळ्यांच्या उत्पादनाचीं मुख्यतः तीन केंद्रें आहेत. त्यांपैकीं खानदेशमध्यें केळ्यांची लागवड मोठ्या प्रमाणावर होते. त्याशिवाय जुन्नर तालुका व वसई तालुका केळीं उत्पादन करतात.

## गिंडी येथील टेलिप्रिंटर्सचा कारखाना

मद्रास राज्यांतील गिंडी ह्या औद्योगिक वसाहतीच्या परिसरांत हिंदुस्थान टेलिप्रिंटर्स ह्या कारखान्याच्या इमारती बांधण्यास लवकरच प्रारंभ होणार आहे. कारखान्यासाठीं १० एकर जागा मिळविण्यांत आलेली आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं एकूण २० लाख रुपये भांडवल लागणार असून त्याच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ लवकरच होणार आहे. सध्यां हा कारखाना गिंडी येथील औद्योगिक वसाहतीमधील एका इमारतींतील भाड्याच्या जागेंत चालविला जातो. कारखान्याला जोडूनच एक शिक्षणकेंद्र उभारण्यांत येणार आहे. येत्या दोन महिन्यांत केंद्राचें काम सुरू होऊन त्यांत कामगारांना टेलिप्रिंटर्सच्या दुरुस्तीचें काम शिकविण्यांत येईल. एका वेळीं १० कामगारांना दोन महिने शिक्षण देण्याची व्यवस्था शाळेंत केली आहे. ह्या कारखान्याचें उत्पादनाचें उद्दिष्ट १,२५० यंत्रांचें ठरविण्यांत आलेलें आहे. तथापि ह्या वर्षीच्या दुसऱ्या सहामाहींत गिंडी येथील कारखान्यांत ३०० यंत्रें जुळविण्यांत येणार आहेत. यंत्रासाठीं लागणाऱ्या भागांचें उत्पादन देशांतच करण्यांत यावें म्हणून जारीनें प्रयत्न करण्यांत येत आहेत. आणखी कांहीं वर्षांत यंत्राचे सर्व भाग देशांतच बनविले जातील आणि संपूर्ण भारतीय बनावटीचे टेलिप्रिंटर्स तयार करण्यांत येऊं लागतील असा विश्वास व्यक्त करण्यांत येत आहे. सुप्रसिद्ध इटालिअन कंपनी ऑलिव्हेटी ह्या कंपनीनें आपल्या इटालीमधील कारखान्यांत १० भारतीय एंजिनिअर्सना उत्पादनाच्या तंत्राचें शिक्षण दिलेलें आहे. त्याशिवाय संकल्पित कारखान्यांत काम करण्यासाठीं आपले सहा तज्ज्ञ कंपनीनें भारतांत पाठविले आहेत. आणखी दोन तज्ज्ञ लवकरच येणार आहेत. हे सर्व तज्ज्ञ भारतामधील कारखान्यांत ३ वर्षे काम करणार आहेत.

## २७ मोठ्या शेड्यूल्ड बँकांचें उत्पन्न व खर्च

( आकडे कोटी रु. चे )

| | १९५९ | १९६० | १९६१ |
|---|---|---|---|
| एकूण उत्पन्न | ७२·३ | ७८·१ | ८७·३ |
| ( १ ) व्याज व डिस्कौंट | ५७·७ | ६१·६ | ६८·४ |
| ( २ ) इतर | १४·६ | १६·५ | १८·९ |
| एकूण खर्च | ६५·२ | ६९·९ | ७६·३ |
| ( १ ) दिलेलें व्याज | ३२·६ | ३४·० | ३६·० |
| ( २ ) पगार | २४·५ | २६·७ | २९·७ |
| ( ३ ) इतर खर्च | ८·१ | ९·२ | १०·६ |
| निव्वळ नफा | ७·१ | ८·२ | ११·० |

## हिंदी बँकांचें वसूल भांडवल, रिझर्व्हज व ठेवी

( आंकडे कोटी रु. चे )

| वसूल भांडवल व रिझर्व्हचे दृष्टीनें आकार | बँकांची संख्या | वसूल भांडवल व रिझर्व्ह | ठेवी |
|---|---|---|---|
| ५०,००० रु. खालीं | — | — | — |
| ५०,००० रु. ते १ लक्ष रु. | ५३ | ०·४ | १·४ |
| १ ते ५ लक्ष रु. | १३५ | २·९ | १६·९ |
| ५ ते ५० लक्ष रु. | ७२ | ९·२ | ११४·६ |
| ५० लक्ष रु. चे वर | २९ | ६३·३ | १५६८·५ |
| एकूण | २८९ | ७५·८ | १७०१·४ |

To facilitate
your trade operations
in Foreign Countries...



Interested in
Export or Import ?

Here is your opportunity !
The Bank of Maharashtra
would provide you with
information for development
of Exports and Open Letters
of Credit for imports
from all over the world.

For further particulars
Contact : Head Office, Poona
or any of the 79 Branches

THE BANK OF
MAHARASHTRA LTD.
Regd. Office : 1177 Budhwar Peth, Poona 2.

(Paramount /62/ 3

## १९६२ मध्यें १५ नवीं तिकिटें

गेलीं पांच वर्षें प्रचारांत असलेलीं पोस्टाचीं कायम तिकिटें नव्या स्वरूपांत पुढील वर्षी स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीं विक्रीस काढण्यांत येणार आहेत. गोवा, दीव व दमण ह्यांच्या पहिल्या मुक्तिदिनानिमित्त या वर्षी डिसेंबरमध्यें एक खास तिकिट काढण्यांत येईल. तसेंच कलकत्ता, मुंबई व मद्रास हायकोर्टांच्या शताब्दीनिमित्त अनुक्रमें १ जुलै, १४ ऑगस्ट व १५ ऑगस्ट रोजीं तिकिटें काढण्यांत येणार आहेत.

सुप्रसिद्ध समाजसुधारक कै. रमाबाई रानडे यांच्या स्मरणार्थ १५ ऑगस्ट रोजीं आणि सुप्रसिद्ध गणितज्ञ श्रीनिवास रामानुजम् यांच्या स्मृत्यर्थ २२ डिसेंबर रोजीं तिकिटें काढण्यांत येणार आहेत. वार्षिक बाल-दिनानिमित्त १४ नोव्हेंबर रोजीं व भारतांत प्रथमच भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय नेत्रविद्या काँग्रेसच्या १९ व्या परिषदेनिमित्त ३ डिसेंबर रोजीं, अशीं आणखी दोन खास तिकिटें काढण्यांत येणार आहेत.

सन १९६२ साठी एकूण १५ नवीं तिकिटें काढण्याचें सुचविण्यांत आलें होतें. त्यांपैकी ७ तिकिटें यापूर्वीच काढण्यांत आलीं असून, त्यांतील अगदी अलीकडचें तिकिट म्हणजे १३ मे रोजीं काढण्यांत आलेलें डॉ. राजेंद्रप्रसाद यांचें तिकिट होय.

युनिव्हर्सल पोस्टल युनियनची १५ वी परिषद भारतांत येत्या मार्चमध्यें भरणार असून त्या वेळीं तिकिटांची एक खास माला काढण्यांत येणार आहे.

## जनरल विम्याच्या कामांत ३ कोटींहून अधिक रुपयांची वाढ

सन १९६० मध्यें भारतीय विमा कंपन्यांच्या सर्व प्रकारच्या जनरल विम्याच्या कामापासून मिळणाऱ्या हप्त्यांच्या निव्वळ उत्पन्नांत वाढ होऊन १९५९ मधील १५·०२ कोटी रुपयांवरून तें १८·५१ कोटी रुपयांवर गेलें. या उत्पन्नाची विभागणी पुढीलप्रमाणें होती. आगीच्या विम्यापासून ५·९३ कोटी रुपये, सागरी विम्यापासून ३·०९ कोटी रुपये व संकीर्ण प्रकारच्या विम्यापासून ९·४९ कोटी रुपये. बिगर-भारतीय विमा कंपन्यांच्या उत्पन्नाचा विचार करतां त्यामध्येंहि १९५९ पेक्षा १९६० मध्यें वाढ झाल्याचें दिसून आलें. १९६० मध्यें त्यांचें हप्त्यांचें निव्वळ उत्पन्न ७·९९ कोटी रुपये झालें. त्यांपैकी ३·१८ कोटी रुपये सागरी विम्यापासून व २·७३ कोटी रुपये संकीर्ण प्रकारच्या विम्यांपासून मिळालें होतें.

## हैदराबादजवळ औषधाचा कारखाना

हैद्राबाद जवळ असलेल्या सनतनगर ह्या ठिकाणीं रशिआच्या मदतीनें औषधें तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना भारतीय सरकारच्या मालकीचा राहील. ह्यासंबंधीं करार नुकताच करण्यांत आला. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस कारखान्यांत प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होईल. सल्फा गटांतील औषधें आणि जीवनसत्त्वें ह्यांची निर्मिति करण्यांत येईल. कारखान्याची यंत्रसामग्री, इतर साधनें आणि तांत्रिक ज्ञान ह्यांचा पुरवठा करण्याची जबाबदारी रशिआनें घेतली आहे. कारखाना व त्याची वसाहत मिळून १८ कोटी रुपये खर्च येणार आहे दरसाल ८५० टन औषधें निर्माण करणाऱ्या ह्या कारखान्यांत २,२०० लोकांना रोजगार मिळेल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

## अर्थव्यवस्थेपुढील संकटाबद्दल इशारा

माजी आय. सी. एस. अधिकारी श्री. एन्. दांडेकर भारताच्या अर्थव्यवस्थेबद्दल बोलतांना म्हणाले कीं, वेळेवरच योग्य उपाय योजण्यांत आले नाहींत तर भारताची अर्थव्यवस्था संकटग्रस्त झाल्याखेरीज राहणार नाहीं. आज अर्थव्यवस्था वहातूक, शिक्षण, पिकासाठी पाणीपुरवठा, इत्यादि अनेक बाबतींत खूपच मागासलेली आहे. त्याशिवाय राज्यकारभारांत इतकी लाचलुचपत वाढली आहे कीं, ती प्रत्यक्षच पाहिल्याशिवाय कळणार नाहीं. श्री. दांडेकर खाजगी मालकीच्या विभागाच्या संघटनेमार्फत बोलत होते. श्री. ए. डी. श्रॉफ हे अध्यक्षस्थानावरून बोलतांना म्हणाले कीं, भारतापुढील आर्थिक संकट मनुष्यनिर्मित आहे; भारताचें आर्थिक नियोजन योजनारहित आहे.

## भारत सरकारला छापखान्याची देणगी

पश्चिम जर्मनीच्या सरकारनें भारत सरकारला एक अद्यावत् छापखाना भेट म्हणून दिला आहे. ह्या छापखान्यांत शाळांतील विद्यार्थ्यांना लागणारीं पाठ्यपुस्तकें छापण्यांत यावयाचीं आहेत. छापखाना उभारण्यासाठी यंत्रज्ञांची मदतहि जर्मनीचें सरकार देत आहे. छापखाना काढण्याचें ठिकाण अद्याप ठरलेलें नाहीं. ऑस्ट्रेलिआकडून पांच वर्षांत १०,००० टन कागद देणगीदाखल मिळणार असून स्वीडनकडून ८,००० टन कागद मिळणार आहे. ह्या कागदाचा उपयोग करून सरकारतर्फे प्राथमिक शाळांचीं पुस्तकें छापण्यांत येणार आहेत आणि तीं गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वाटण्यांत येणार आहेत. हें काम राज्यसरकारांकडे सोंपविण्यांत येणार आहे. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराला ह्या उपक्रमामुळें चांगली मदत होणार आहे.


## वाढत्या लोकसंख्येवर एकच उपाय

मुंबई येथील सुप्रसिद्ध सर्जन डॉ. जी. एम्. फडके ह्यांचें मुंबई येथील रोटरी क्लबांत संततिनियमनाबाबत शस्त्रक्रियेचें स्थान ह्या विषयावर व्याख्यान झालें. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, भारतामधील लोकसंख्येच्या वाढीला आळा घालण्यासाठी वेळींच उपाय योजण्यांत आले नाहींत, तर १९७५ च्या सुमारास भारताची लोकसंख्या सध्यांच्या दुप्पट होईल. लोकसंख्येच्या वाढीवर खरा उपाय एकच आहे आणि तो म्हणजे संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया. हा उपाय लोकप्रिय करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्याची आवश्यकता आहे संततिनियमनासाठी वापरण्यांत येणारे कांहीं उपाय किचकट आणि महाग आहेत. शस्त्रक्रियेच्या उपायानें स्त्रीला अगर पुरुषाला धोका पोंचतो, ही समजूत चुकीची आहे.

## दक्षिणेंत तेलशुद्धीचा कारखाना

दक्षिण हिंदुस्थानांत काढण्यांत यावयाचा तेलशुद्धीचा कारखाना तुतिकोरीन येथें उभारण्यांत येण्याचा संभव आहे. पेट्रोलच्या धंद्यांतील दोघां तज्ज्ञांनीं तुतिकोरीन ह्या बंदराला नुकतीच भेट देऊन पहाणी केली. चांगलें बंदर, विस्तीर्ण जमीन, रेल्वेवहातुकीची व्यवस्था, भरपूर पाणीपुरवठा, इत्यादि सोयींची तेल कारखान्याला अतिशय आवश्यकता असते. ह्या सोयी तुतिकोरीनला उपलब्ध आहेत. दक्षिणेंतील कारखान्यांना चांगला दगडी कोळसा फार दुरवरून आणावा लागतो. कारखान्यांनीं जळणासाठी तेलाचा उपयोग करावा म्हणून सरकारचे प्रयत्न चालू आहेत. तुतिकोरीनचा संकल्पित कारखाना त्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे.

## श्री. गुलाबराव रघुनाथराव पाटील
### सहकारी क्षेत्रांतील कामगिरी



सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. चे. चेअरमन श्री. गुलाबराव रघुनाथराव पाटील बी. ए., एलएल बी. हे १९५२ पासून सहकारी चळवळींत काम करीत आहेत. त्यांचा जन्म १६ सप्टेंबर १९२१ रोजीं बेनाडी (ता. चिकोडी, जि. बेळगांव) येथें झाला. त्यांनीं सहकारी क्षेत्रांत केलेल्या कामाचा थोडक्यांत परिचय येथें दिला आहे.

दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सन १९५६–५७ सालापासून चेअरमन. त्यांचे प्रयत्नामुळें बँकेचा व्याप दुप्पट वाढला आहे व जिल्ह्यांतील सहकारी चळवळीची सर्वांगीण प्रगति झाली आहे. वेअरहाऊस रिसिटवर शेतकऱ्यांना कर्ज देणेंबाबत त्यांनीं पुढाकार घेतला. अशा पद्धतीनें कर्जे देण्याची प्रथा या बँकेनें महाराष्ट्र राज्यांत प्रथमच सुरू केली. शेतकऱ्यांना कर्जेवाटपाचे बाबतींत मर्यादा वाढवून कर्ज देणेंबाबत व पीक उत्पादनांत भर टाकणेस या बँकेचे चेअरमन या नात्यानें त्यांनीं खूप प्रयत्न केले आहेत. सांगली येथील सहकारी साखर कारखाना उभारणेचे कामीं या बँकेनें जें सक्रिय साहाय्य केलें, त्यामध्यें त्यांनीं पुढाकार घेतला होता.

त्याचप्रमाणें, जिल्ह्यांतील सहकारी खरेदी–विक्री संघाचें कामकाज–सुधारणेंत बँकेचे चेअरमन व सार्वजनिक कार्यकर्ते म्हणून त्यांचा फार मोठा वाटा आहे. या जिल्ह्यांतील नवीन स्थापन झालेली सांगली जिल्हा जमीन तारण बँक लि., सांगली ही त्यांचे प्रयत्नाचें फळ होय.

श्री. गुलाबराव पाटील, हे सांगली नगरपालिकेचे सन १९५४–५५ सालीं अध्यक्ष होते. सध्यां ते खालील निरनिराळ्या सहकारी व सार्वजनिक संस्थांमध्यें कार्य करीत आहेत: —

(१) चेअरमन, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सांगली.

(२) चेअरमन, पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मंडळ लि. पुणें.

(३) डायरेक्टर, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई.

(४) डायरेक्टर, शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. सांगली.

(५) डायरेक्टर, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. कोल्हापूर.

(६) डायरेक्टर, श्रीगणपति जिल्हा सहकारी ख. वि. संघ लि. सांगली.

(७) डायरेक्टर, जनता सहकारी बँक लि. सांगली.

(८) डायरेक्टर, दक्षिण सातारा जिल्हा सह. दूध उत्पादक संघ लि. सांगली.

(९) सभासद, ॲग्रिकल्चरल प्रोडयूस मार्केट कमिटी, सांगली.

(१०) महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेनें नेमलेल्या को. ऑप. इंडस्ट्रिज कमिशनचे सभासद.

(११) महाराष्ट्र राज्य सहकारी युनियनचे उपाध्यक्ष.

### सरकारी मिठाच्या कंपनीला तोटा

भारत सरकारच्या मालकीच्या हिंदुस्थान सॉल्ट कंपनी लि. ह्या कंपनीला १९६०–६१ सालीं ५·५९ लाख रुपये तोटा झाला. कंपनीच्या मालमत्तेवरील ५·७० लाख रुपये घसारा बाजूला काढून ठेवण्यांत आला आहे. अहवालाच्या सालीं कंपनीनें २,६१,००० मेट्रिक टन मिठाचें उत्पादन करण्याचें लक्ष्य ठरविलें होतें. परंतु प्रत्यक्ष उत्पादन मात्र २,००,००० मेट्रिक टन झालें. १९५९–६० सालीं २,८७,००० मेट्रिक टन मिठाचें उत्पादन करण्यांत आलें होते. कंपनीनें फक्त उत्तम प्रतीच्या मिठाचेंच उत्पादन केलें. लवकरच टेबल सॉल्टचें उत्पादन व्यापारी प्रमाणावर चालू करण्यांत येणार आहे.

### रिहंड धरणावर उत्पन्न होणारी वीज

पुढील महिन्याच्या अखेरीपासून उत्तर प्रदेशांतील रिहंड धरणांतील पाण्याच्या साह्यानें १ लाख किलोवॅट वीज उत्पन्न करण्यांत येऊं लागेल. धरणावरील वीज–उत्पादनाची ही अंतिम मर्यादा आहे. इतकी वीज उत्पन्न होऊं लागल्यावर रेल्वेला आणि अल्युमिनियमच्या कारखान्याला विजेचा पुरेसा पुरवठा सुरू करण्यांत येईल. दरम्यान उत्तर प्रदेश सरकारनें मध्यम, छोट्या आणि भारी उद्योगधंद्यांना पुरविण्यांत येणाऱ्या विजेच्या दरांत कपात करण्याचें ठरविलें आहे. पूर्व उत्तर–प्रदेशांत अधिक कारखाने निघावेत म्हणून ही कपात करण्यांत आली आहे. ह्या कपातीमुळें राज्य सरकारला दरसाल २० लाख रुपयांचा तोटा सहन करावा लागेल, असें सांगण्यांत येत आहे.

### पंजाबमधील धरणाची योजना

पंजाब सरकारनें रावी नदीवर एक धरण बांधण्याचें ठरविलें आहे. संकल्पित धरण म्हणजे राज्य सरकारनें तयार केलेल्या बहुद्देशीय मोठ्या योजनेचा एक भाग आहे. धरणाच्या भिंतीची उंची ४८० फूट होईल. योजनेचा आराखडा मध्यवर्ती सरकारच्या मंजुरीसाठी पाठविण्यांत आला आहे. योजनेच्या पूर्तीसाठी एकूण ४१ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. धरणांतील जलप्रवाहाच्या साह्यानें २ लाख किलोवॅट वीज निर्माण करण्यांत येणार आहे.

### केरळ राज्यांत यांत्रिक हत्यारांचा कारखाना

केरळ राज्य औद्योगिक दृष्ट्या मागासलेलें आहे. राज्यांत भारी उद्योगधंदे काढण्यांत यावे म्हणजे औद्योगीकरणाचा पाया घातल्यासारखे होईल, असें सरकारचें मत असून त्यासाठी त्यानें आग्रहहि धरला होता. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत केरळ राज्यांत यांत्रिक हत्यारांचा एक कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत काढण्यांत येणार आहे. देशांतील अशा प्रकारचा हा तिसरा कारखाना होईल. ह्या कारखान्यासाठी ६ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. तो उभारण्याचें काम बंगलोर येथील हिंदुस्थान मशीन टूल कारखान्यातर्फे होणार आहे.

### अजंठा येथें प्रवाश्यांची राहण्याची सोय

औरंगाबादपासून ७० मैलांवर असलेली अजिंठा येथील लेणीं पाहण्यासाठी परदेशी व देशी प्रवाइयांची हंगामांत गर्दी होत असते. परंतु खुद्द लेण्याजवळ प्रवाश्यांना राहाण्याची सोय आजपर्यंत नव्हती. आतां त्या ठिकाणीं एक प्रशस्त विश्रांतिस्थान व फराळघर बांधण्यांत येत आहे. त्याशिवाय प्रवाश्यांना मुक्कामाला राहण्यासाठी एक मोठा दिवाणखानाहि बांधण्यांत येत आहे. ह्या इमारतीसाठी ३॥ लाख रुपये खर्च येणार आहे. पुढील हंगामांत त्या वापरता येतील.

### जुगाराविरुद्ध मोहीम

सौराष्ट्रामधील जिमखाने व क्रीडासंस्था ह्यामध्यें मोठ्या प्रमाणावर जुगार खेळण्यांत येतो आणि त्यांत मोठमोठ्या रकमांच्या उलाढाली होतात, अशा तक्रारी पोलिसखात्याकडे करण्यांत आल्या होत्या. तक्रारींची दखल घेऊन सौराष्ट्र पोलिसांनीं अशा संस्थांतील जुगाराविरुद्ध मोहीम चालू केली आहे. सौराष्ट्रांत राजकोट, जेतपूर, जामनगर, भावनगर, इत्यादि शहरांतून जिमखाने आहेत.

### किर्लोस्कर ब्रदर्सची भांडवल वाढ

किर्लोस्कर ब्रदर्स लि. ला प्रत्येकीं २५ रु. चे ४०,००० ऑर्डिनरी भाग आणि प्रत्येकीं २५ रु. चे ९% चे ६०,००० प्रेफरन्स भाग विक्रीस काढण्यास मंजुरी मिळाली आहे. ऑर्डिनरी भागावर १२ रु. वाढावा घ्यावयाचा आहे; प्रेफरन्स भाग दर्शनी किंमतीला विकावयाचे आहेत.

### रेल्वेस मिळालेलें व्यापारी जाहिरातींचें उत्पन्न

रेल्वेस सन १९६१-६२ मध्यें रेल्वे स्टेशनें आणि आगगाड्यांतील भिंतीपत्रकें आणि व्यापारी जाहिराती यांपासून २७,३४,८५१ रुपये उत्पन्न आलें. १९५९–६० मध्यें हेंच उत्पन्न २०,५२,४६५ रुपये आणि १९६०-६१ मध्यें २१,७९,४८७ रुपये मिळालें होतें.

### पुण्यांतील रिक्शा व टॅक्सी ह्यांची संख्या वाढणार

येत्या ऑगस्ट पासून पुण्यांतील छोट्या टॅक्सी व ऑटोरिक्शा ह्यांच्या संख्येंत वाढ होणार आहे. सध्यां ३५० ऑटोरिक्शा, १९० छोट्या टॅक्सी आणि ७५ मोठ्या टॅक्सी आहेत. १०० ऑटोरिक्शा आणि ८७ छोट्या टॅक्सींना आतां लायसेन्स दिले जाईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००
बचतीच्या आकर्षक योजना
( १ ) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर २॥ टक्के
( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत — " ३। "
( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — " ५ "
*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

वाढत्या धंद्याकरितां
मर्यादित
मुदतीच्या ठेवी
घेणें आहेत.
The Travancore Ogale Glass, Mfg. Co. Ltd.
P. O. Udyogamandal,
( KERALA. )

# मोरेटोरियमखाली आलेल्या बँका

## तीस बँकांचें विलीनीकरण

१९६१ मध्यें एकूण ३० बँकांचें इतर बँकांत विलीनीकरण झालें. बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या ४५ व्या कलमाखालीं रिझर्व्ह बँकेनें केलेल्या ह्या कारवाईचा तपशील येथें दिला आहे :—

| विलीन झालेली बँक | कचेऱ्यांची संख्या | कुणांत विलीन झाली | विलीनीकरणाच्या अंमलबजावणीची तारीख |
|---|---|---|---|
| १ प्रभात ( दिल्ली ) | ४ | नॅशनल ( दिल्ली ) | ९-३-६१ |
| २ इंडो-कमर्शिअल ( मयुरम ) | २८ | पंजाब नॅशनल ( दिल्ली ) | २५-३-६१ |
| ३ न्यू सिटिझन ( मुंबई ) | ४४ | बरोडा ( बरोडा ) | २९-४-६१ |
| ४ केरळ ( त्रिवेंद्रम ) | ३ | कॅनरा ( मंगलोर ) | २०-५-६१ |
| ५ नागपूर ( नागपूर ) | १६ | महाराष्ट्र ( पुणें ) | २७-३-६१ |
| ६ त्रावणकोर फॉरवर्ड ( कोट्टायम ) | ४९ | स्टेट बँक त्रावणकोर ( त्रिवेंद्रम ) | १५-५-६१ |
| ७ कोट्टायम ओरिअंट ( कोट्टायम ) | ३६ | ” | १७-६-६१ |
| ८ न्यू इंडिया ( त्रिवेंद्रम ) | २८ | ” | ” |
| ९ सिसिया मिडलंड ( अलेप्पी ) | ७ | कॅनरा ( मंगलोर | ” |
| १० वेनडु ( पुलिनकन्नू ) | २ | साऊथ इंडियन ( त्रिचूर ) | ” |
| ११ भारत इंडास्ट्रिअल ( पुणें ) | ७ | महाराष्ट्र ( पुणें ) | १-७-६१ |
| १२ कोंकण ( मालवण ) | ६ | ” | १९-६-६१ |
| १३ पूना ( पुणें ) | ४ | सांगली ( सांगली ) | ३-६-६१ |
| १४ पूना इन्व्हेस्टर्स ( पुणें ) | १ | ” | २६-८-६१ |
| १५ मर्चंट्स ( तंजोर ) | ३ | तंजोर पर्मनंट ( तंजोर ) | ४-९-६१ |
| १६ सिटिझन्स ( बेळगांव ) | १८ | कॅनरा बँक ( उडिपी ) | १७-१०-६१ |
| १७ वंकानेर ( वंकानेर ) | १ | देवकरण नानजी ( मुंबई ) | १७-६-६१ |
| १८ रायलसीमा ( अनंतपूर ) | २ | इंडियन ( मद्रास ) | १-९-६१ |
| १९ पीपल्स ( तीर्थहल्ला ) | ५ | कॅनरा इं. बँक ( उडिपी ) | १४-११-६१ |
| २० कॅथॉलिक ( मंगलोर ) | १० | ” | ११-९-६१ |
| २१ पाय-मनी ( मंगलोर ) | १ | ” | ४-९-६१ |
| २२ मुल्की ( मुल्की ) | १ | ” | ” |
| २३ जी रघुनाथमल ( हैद्राबाद ) | ५ | कॅनरा ( मंगलोर ) | ” |
| २४ सातारा स्वदेशी क. ( सातारा ) | ७ | यु. वेस्टर्न ( सातारा ) | ६-९-६१ |
| २५ कटक ( कटक ) | १ | युनियन ( कलकत्ता ) | ४-९-६१ |
| २६ तेझपूर इंड. ( तेझपूर ) | १ | ” | ” |
| २७ प्रताप ( दिल्ली ) | २ | लक्ष्मी कमर्शिअल ( दिल्ली ) | ११-१२-६१ |
| २८ करूर ( करूर ) | १ | लक्ष्मी विलास ( करूर ) | १९-१०-६१ |
| २९ जोधपूर कमर्शिअल ( जोधपूर ) | १३ | सेंट्रल ( मुंबई ) | १६-१०-६१ |
| ३० फलटण ( फलटण ) | १ | सांगली ( सांगली ) | ७-१०-६१ |

★ हार्डबोर्ड, ★ प्लायवुड, ★ टीकप्लाय, ★ इन्सुलेशन बोर्ड, ★ ब्लॅकबोर्ड,
★ लोखंडी खुर्च्या, उत्तम व सरस

योग्य भावांत मिळण्याचें एकमेव ठिकाण

दलाल आणि कंपनी

सोन्यामारुती चौक, लक्ष्मी रोड, पुणें २

## कंपन्यांवरील नऊ जबाबदाऱ्या

( १ ) त्या नफ्यांत चालल्या पाहिजेत. कंपनीला नफा होत नसेल, तर ती फार काळ टिकणार नाहीं; तिचें उद्देश कितीका चांगले असेनांत.

( २ ) कंपनीचा व्यवहार वाढत गेला पाहिजे. त्यामुळें आजूबाजूच्या सर्वांचाच उत्कर्ष होतो. अधिक लोकांना नोकऱ्या मिळतात, विवाहांची संख्या वाढते, स्थानिक व्यापाऱ्यांची विक्री जास्त होते.

( ३ ) मालाचा दर्जा उत्कृष्ट असावा, किंमत रास्त असावी, इत्यादि गोष्टी मग ओघानें आल्याच. त्याखेरीज वरची, दुसरी, जबाबदारी पार पाडता येणार नाहीं.

( ४ ) कामगारांशीं संबंध सलोख्याचे राखले पाहिजेत. समाधानी, निष्ठावंत नोकरांमुळें कंपनीचा लौकिक वाढतो.

( ५ ) समाजाला कंपनीबद्दल रास्त माहिती देत राहायला हवें; कंपनीचें कार्य, तिच्या योजना, तिच्या अडचणी, ह्यांचें यथायोग्य ज्ञान झालें म्हणजे कंपनीला अनुकूल वातावरण निर्माण होतें.

( ६ ) खुल्या स्पर्धेचे फायदे कंपनीनें पटवून देत राहिले पाहिजे.

( ७ ) समाजाचा एक खराखुरा घटक कंपनीनें बनलें पाहिजे; समाजाच्या सर्वांगीण विकासांत सहभागी व्हायला हवें.

( ८ ) शिक्षणाला प्रत्यक्ष रीतीनें मदत केली पाहिजे. आजचा विद्यार्थी हा उद्याचा नोकर असतो. लायक तरुणांना शिक्षण नाइलाजानें सोडून द्यावें लागलें, तर त्यामुळें राष्ट्राची हानि होते.

( ९ ) कंपनीनें शेजारधर्म पाळला पाहिजे. वरच्या आठ जबाबदाऱ्यांची जाणीव असल्यावर ही जबाबदारी पार पाडणें सोपें आहे.

## रेल्वेला होणारा नफा

मध्यवर्ती सरकारचे रेल्वेखात्याचे उपमंत्री श्री. एस. व्ही. रामस्वामी ह्यांनीं मद्रास येथें अशी माहिती सांगितली कीं १९६१–६२ सालांत भारतामधील रेल्वेला ५२ कोटी रुपये निव्वळ नफा झाला. रेल्वेला एकूण उत्पन्न ५४२ कोटी रुपये झालें. रेल्वेचे एकूण ८ विभाग असून त्यांपैकी ५ विभागच नफ्यांत चालतात. बाकीचे विभाग तोट्यांत चालतात. आकड्यांची फोड करून सांगतांना ते म्हणाले कीं, आग्नेय रेल्वेनें १६ कोटी रुपये, पश्चिम रेल्वेनें १२·६ कोटी रुपये, मध्य रेल्वेनें १४ कोटी रुपये, पूर्व रेल्वेनें ८ कोटी रुपये आणि उत्तर रेल्वेनें १·७ कोटी रुपये नफा मिळविला.

## देखरेख नसणारीं रेल्वेचीं फाटकें

भारताच्या निरनिराळ्या रेल्वेमार्गांवर मिळून ३२,००० रेल्वेचीं फाटकें आहेत. अशा ठिकाणीं रेल्वेमार्गावरूनच रस्ता ओलांडावा लागतो व त्यामुळें अपघात होण्याचा संभव असतो. वरील संख्येपैकी १२,००० फाटकांवर ती उघडण्यासाठी व बंद करण्यासाठी माणूस ठेवलेला नाहीं. ह्या ठिकाणीं माणसांची सोय करावयाची झाल्यास त्यांच्या राहण्याच्या जागांसाठी २० कोटी रुपये खर्च करावे लागतील. त्याशिवाय फाटकांची देखरेख करण्यासाठी दरसाल १० कोटी रुपये लागतील. सुमारें १,००० रेल्वेफाटकांवर ताबडतोब माणसें नेमण्याची आवश्यकता आहे.

## नव्या बँक-अवार्डला सरकारची मान्यता

न्यायमूर्ति देसाईनीं दिलेल्या बँक–अवार्डला भारत सरकारनें मान्यता दिली असून चालू आठवड्यांत सरकारी निर्णयासह त्याचा तपशील प्रसिद्ध होईल. स्टेट बँक आणि तिच्या सबसिडिअरी बँका ह्यांनाहि तें लागू होईल. ठेवी आणि व्यवहार ह्यांच्या आकारानुसार बँकांची आतां तीन प्रकारांत वर्गवारी करण्यांत आली आहे; त्याप्रमाणें पगार आणि महागाई भत्ता दिला जाईल. चालू महागाई भत्त्याचा ह्यापुढें पगारांतच समावेश होईल आणि इंडेक्स नंबराप्रमाणें बदलणारा नवा महागाई भत्ता दिला जाईल. बोनसबद्दल शिफारशी अद्याप करण्यांत आलेल्या नाहींत; रिझर्व्ह बँक–नोकरांच्या पगाराच्या अवार्डनंतर बोनसचा प्रश्न निकालांत काढला जाईल. ७५,००० बँक–नोकरांचे हितसंबंध प्रस्तुत अवार्डमध्यें गुंतलेले आहेत.

## युरोपांतील बडे आठ विजेच्या साहित्याचे कारखानदार

( १९६० चे आंकडे )

| कंपनी | देश | विक्री (कोटी डॉलर्स) | कामगार संख्या |
|---|---|---|---|
| १ फिलिप्स | नेदरलंड्स | १२५ | २,१०,००० |
| २ सीमेन्स | प. जर्मनी | ९७ | २,०९,००० |
| ३ एईजी | प. जर्मनी | ६० | १,१९,००० |
| ४ एईआय | ब्रिटन | ६० | १,०५,००० |
| ५ ब्राउन बोव्हेरी | स्वित्झरलंड | ४८ | ७३,००० |
| ६ इंग्लिश इलेक्ट्रिक | ब्रिटन | ४५ | ८०,००० |
| ७ बॉश | प. जर्मनी | ४२ | ७१,००० |
| ८ जीईसी | ब्रिटन | ३३ | ६३,००० |

★ दि बेळगांव बँक लि. शीं बँकिंगचे व्यवहार करा; कारण ही बँक तुमच्या हिताचे वडीलधाऱ्या माणसाप्रमाणें संरक्षण करील.

★ खरोखरच चांगल्या बँकेकडून खातेदारांच्या ज्या ज्या अपेक्षा असतील, त्या त्या सर्व पुऱ्या पाडण्यास बेळगांव बँक सिद्ध आहे.

★ ठेवी, कर्जें, बिल कलेक्शन, फंड रेमिटन्स, सेफ कस्टडी, बँक गॅरंटी, सॉलव्हन्सी सर्टिफिकेट, इत्यादि आमच्या अनेक व्यवहारांचा तपशील मागवा.

दि बेळगांव बँक लि.

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

रजिस्टर्ड आणि मुख्य कचेरी : रविवार पेठ, बेळगांव

बँकिंग क्षेत्रांतील ३२ वर्षांच्या अनुभवाचे आधारें आम्हीं आपली तत्परतेनें आणि कार्यक्षमतेनें सेवा करूं शकतों.

२८ शाखांपैकी कोणत्याहि शाखेच्या द्वारां आमच्या सेवेचा फायदा घ्या.

ए. आर. नाईक, बी. ए., बी. एस्सी., एलएल. बी. मॅनेजिंग डायरेक्टर

बी. बी. पोतदार, बी. ए., एलएल. बी. चेअरमन

## G. D. C. & A. Result

**( Examination held in April, 1962 )**

**POONA CENTRE**

**First Class and Second Class :** Nil

**Pass Class :** P. S. Chore, B. A. Karadge, V. K. Kale, V. V. Limaye, K. F. Parekh, D. N. Sonsale, B D. Chaudhari, V. S. Chandgadkar, N. L. Dixit, S. B. Gujarathi, H. B. Mane, H. G. Mohite, G. P. Oak, B. B. Pattanshetty, K. D. Pradhan, P. N. Chirmade, G. B. Dalal, N. W. Deshmukh, J. H. Jadhav, Bhikaje Vishnu Kulkarni, B. D. Mahajan, H. D. Patil, M. D. Patil, H. R. Sinari, S. N. Sathe, G. D. Upasani, J. R. Raisinghani.

**Passed in "Co-operation Group" only :** C. C. Deokar, B. P. Kabbur, V. M. Kshirsagar, S. A. Moati, M. Raghavrao, L. S. Sawant, N. S. Amritkar, A. A. Bogar, C. D. Chincholikar, K. G. Dhumal, V. B. Dhobale, P. B. Gaikwad, V. R. Gholap, V. B. Hulyalkar, B. G. Joshi, B. P. Joshi, G. G. Jadhav, P. S. Junnare, L. M. Kalgutkar, M. M. Kshirsagar, G. B. Mhalas D. V. Narvekar, H. L. Namdas, G. S. Prabhudesai, N. G. Patwardhan, R. B. Patil, M. V. Salvekar, S. G. Tulpule.

**Passed in "Accountancy Group" only :** G. J. Bapat, V. V. Desai, S. B. Jambhekar, S. V. Joshi, P. G. Kenjale, P. J. Rijhwani, A. A. Shaikh.

**NAGPUR CENTRE**

**Pass Class :** N. P. Barabde.

**Passed in "Co-operation Group" only :** M. G. Gadhikar, R. B. Kale, Y. N. Khairmode.

**Passed in "Accountancy Group" only :** S. K. Jain.

**Exemptions**

**Poona Centre**

| | *Paper No. and Name of the Group* |
|---|---|
| T. Antony, | I, III and IV of Coopn. Group |
| C. C. Deokar, | V and VII of Accounts Group |
| G. S. Chitwar, | I and III of Coopn. Group |
| R. A. Deshpande, | I, II, III of Coopn. Group |
| S. P. Hujare, | III and IV of Coopn. Group. |
| I. L Jaindani, | I, II and III of Coopn. Group |
| S. K. Kavade, | I, and III of Coopn. Group |
| B. G. Sutar, | I, II and III of Coopn. Group |
| R. B. Satre, | I and III of Coopn. Group |
| K. B. Soman, | V and VI of Accountancy Group. |

**Nagpur Centre**

| | |
|---|---|
| J. R. Morey, | I and III of Coopn. Group. |

In addition to the above, the following candidate is declared to have passed the full G. D. C. & A. Examination in pursuance of Regulation No. 3 of the Regulation for the Award of G. D. C. & A.

(1) Shri Kazi Bashiruddin.

**Sd/-L. N. Bongirwar**
*Registrar and Chairman*

---

### राजधानींतील सरकारी मालकीच्या हॉटेलांस नफा

राजधानींतील अशोक हॉटेल्स लि. आणि हॉटेल जनपथ या सरकारी मालकीच्या दोन्ही हॉटेलांस गेल्या आर्थिक वर्षांत २९,१९,६२० रुपये नफा झाला. १९५९–६० मधील नफ्यापेक्षा हा नफा १७,२५,९११ रुपयांनीं अधिक आहे. या दोन्ही हॉटेलांत मद्यपानास मुभा आहे. परंतु तेथील सार्वजनिक दालनांत मात्र तें करतां येत नाहीं.

## Co-operative Training College, Poona

**5 B. J. Road, P. B. No. 32, Poona 1**

Result of the Examination for the Higher Diploma in Co-operation held in April 1962.

*Name of the trainee*

**First Class :** Y. D. Deshpande, V. R. Nagne, R. L. Dani, N. S. Dehal, D. R. Patil.

**Second Class :** D. G. Khondre, R. d. Pande, S. V. Chandrachud, B. D. Sharma, T. B. Khedkar, P. S. Chore, R. M. Patil, C. T. Girase, K. H. Trivedi, H. N. Sinari, S. A. Redkar, C. C. Deokar, D. K. Dhamane, G. K. Shah, A. H. Lonikar, B. P. Vachharajani, S. G. Deshpande, M. K. Bagad, D. H. Gadiya, U. C. Patil, M. M. Kolwadkar, N. S. Shukla, B. H. Munshi, N. K. Desai, G. B. Chitale, K. D. Pradhan, M. S. Patil, M. W. Mujumdar, S. B. Ostwal, P. N. Marathe, M. E. Patil, P. C. Joshi, J. M. Patel.

**Pass Class :** V. B. Jugade, I. D. Pandya, S. N. Deshpande, C. G. Deshpande, A. A. Sarnaik, K. A. Ubagade, S. K. Mandale, M. M. Gaikwad, P. N. Gadre, P. Y. Mhaskar, D. B. Nikam.

**Passed with exemption in Book-Keeping, Accountancy and Co-operative Auditing**

S. N. Nandi, R. M. Gandhi, C. B. Patel, A. C. Gandhi, A. D. Datey, B. P. Fadia.

**Prize**

The Bomday State Industrial Co-operative Association Prize of Rs. 50/- is awarded to Shri B. H. Munshi who secured the highest number of marks in the optional subject of Industrial Co-operation viz. 59 out of 100.

**P. M. Chengappa,**
*Principal.*

D/-30th June 1962.

---

### सरकारी फार्ममधून साखर कारखान्यांना ऊस-पुरवठा

लँड सीलिंग कायद्याप्रमाणें, मुंबई राज्यांतील १४ साखर-कारखान्यांना आपली ९० हजार एकर जमीन ऑक्टोबरपूर्वी राज्यसरकारच्या स्वाधीन करावी लागेल. त्या जमिनी मूळ शेत-मालकांच्या सहकारी सोसायट्या स्थापून त्यांना देण्याऐवजीं सरकारी मालकीचे फार्म करण्याचा सरकारचा विचार आहे; त्यासाठी एक स्वतंत्र कॉर्पोरेशनच निर्माण केली जाईल. सध्यां सुरतगड येथील सरकारी फार्म सर्वांत मोठें म्हणजे ३०,००० एकरांचें आहे. मुंबई सरकारचें फार्म सहा जिल्ह्यांत पसरेल :—

| | | |
|---|---|---|
| अहमदनगर | ५ कारखाने | ३०,००० एकर |
| सोलापूर | ३ ,, | २१,००० ,, |
| सातारा | १ ,, | ८,००० ,, |
| कोल्हापूर | १ ,, | ६,००० ,, |
| नाशिक | १ ,, | ५,००० ,, |
| औरंगाबाद | १ ,, | ५,००० ,, |

खाजगी फार्मइतक्याच कार्यक्षमतेनें सरकारी फार्महि कारखान्यांना ऊसपुरवठा करतील, असें मुख्य मंत्र्यांनीं आश्वासन दिल्यावरून नियोजन मंडळानें साखरकारखान्यांच्या जमिनींना सीलिंग लावण्यास अनुमति दिली, असें समजतें.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.